PlanetRead
Literacy for a Billion

Movie: Pudhach Paool
Year: 1986

Song: Bai Lek Hi Ladachi
Lyricist: Sudhir Moghe

बाई लेक ही लाडाची
आता सासरी जायाची
बाई लेक ही लाडाची
आता सासरी जायाची
लावा हळद गं नीट
लावा हळद गं नीट
गाली काजळाची तीट
दिसे रंभेच्या तोडीची
दिसे रंभेच्या तोडीची
मिळो सासू गं गोडीची
का गं साजणी भिजे पापणी
का गं साजणी भिजे पापणी
सोनं पाऊली गं बघ येई कुणी
बघ साजणी तुझ्या अंगणी
बघ साजणी तुझ्या अंगणी
सुख येई नवे तुज नेई सवे
का गं साजणी भिजे पापणी
का गं साजणी भिजे पापणी

अत्तराच्या वासापरी बाळपण गेलं
सोनचाफ्यापरी वय नव्हाळीचं आलं
अत्तराच्या वासापरी बाळपण गेलं
सोनचाफ्या परी वय नव्हाळीचंआलं
काही हरवलं काही गवसलं
काही हरवलं काही गवसलं
जोडीदार नवा अन् खेळ नवा
का गं साजणी भिजे पापणी
का गं साजणी भिजे पापणी
घाणा गं भरीला विडा गं ठेविला

घाणा गं भरीला विडा गं ठेविला
कुळाच्या देवाला गं कुळाच्या देवाला
कुळाच्या देवाला गं कुळाच्या देवाला
कुळाच्या दैवता ठेवा गं अक्षता
कुळाच्या दैवता ठेवा गं अक्षता
नेत असे तडीला गं नेत असे तडीला
नेत असे तडीला गं नेत असे तडीला

अग्नी देवा सभोवती सप्तपदी चाले
सात पाऊलात तुझ्या सात स्वर्ग आले
अग्नीदेवा सभोवती सप्तपदी चाले
सात पाऊलात तुझ्या सात स्वर्ग आहे
दोन्ही जीव बांधियले दोन्ही वस्त्रांसवे
दोन्ही जीव बांधियले दोन्ही वस्त्रांसवे
तसे यावे जुळूनिया मनांचे ही दुवे
तसे यावे जुळूनिया मनांचे ही दुवे

नकोस डोळा आणू पाणी
साक्ष घे मनाची
आई आपुली दोन दिसांची
सासू गं जन्माची
नकोस डोळा आणू पाणी
ऐक गं मनाचं
माहेर बाई दोन दिसांचं
सासर गं जन्माचं
सासर गं जन्माचं
मागे वळूनिया नको पाहू बाई
मागे वळूनिया नको पाहू बाई

Literacy for a Billion

मागे वळूनिया नको पाहू बाई
मागे वळूनिया नको पाहू बाई
जरी ओढ तुटे ना जरी माया सुटेना
जरी ओढ तुटेना जरी माया सुटेना

तरी रीत भल्या घरची गं
कधी कळेना
मागे वळूनिया नको पाहू बाई
मागे वळूनिया नको पाहू बाई

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*